**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.हनुमंत मुरलीधर तळेकर
मु.पो.केम, ता.करमाळा, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महावितरण विभागीय कार्यालय, बार्शी, जि.सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
महावितरण विभागीय कार्यालय, बार्शी, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९७ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महावितरण विभागीय कार्यालय, बार्शी, जि.सोलापूर श्री.बी.बी.देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा उपकार्यकारी अभियंता,
महावितरण विभागीय कार्यालय, बार्शी, जि.सोलापूर श्री.पी.एस.जोशी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १०.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.६.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१८.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२८.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.हनुमंत मुरलीधर तळेकर यांनी मागितलेली माहिती अन्य व्यक्तीच्या वीज कनेक्शन संबंधातील होती. माहिती सहाय्यक अभियंता तथा उपविभागीय अधिकारी, जेऊर यांच्या कक्षेत येत असल्यामुळे अर्ज त्यांच्याकडे वर्ग केला. त्यानुसार आपण दिलेली माहिती विभागीय कार्यालयाने श्री.तळेकर यांना टपालाने पाठविली, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, महावितरण विभागीय कार्यालय, बार्शी, जि.सोलापूर श्री.पी.एस.जोशी यांनी पूरक कागदपत्रांसह केले. माहिती मिळाली नसल्याची तक्रार श्री.तळेकर यांनी केली असल्यामुळे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'नंतर पुन्हा एकदा रजिस्टर्ड टपालाने त्यांना माहिती पाठविण्यात आल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महावितरण विभागीय कार्यालय, बार्शी, जि.सोलापूर श्री.बी.बी.देशपांडे यांनी नमूद केले. आपल्या म्हणण्याच्या पृष्ट्यर्थ त्यांनी पूरक कागदपत्रे सादर केली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रामचंद्र बाळू शितोळे
पांगिरे(ए), ता.चिकोडी, जि.बेळगाव — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा चेअरमन,
के.आय.टी.अभियांत्रिकी महाविद्यालय, गोकुळ शिरगाव, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य,
के.आय.टी.अभियांत्रिकी महाविद्यालय, गोकुळ, ता.शिरगाव, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ४९८ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रामचंद्र बाळू शितोळे
पांगिरे(ए), ता.चिकोडी, जि.बेळगाव

**अपिलीय प्राधिकारी** तथा चेअरमन, के.आय.टी.अभियांत्रिकी महाविद्यालय,
गोकुळ शिरगाव, जि.कोल्हापूर श्री.अ.पा.राणे

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, के.आय.टी.अभियांत्रिकी महाविद्यालय,
गोकुळ शिरगाव, जि.कोल्हापूर डॉ.व्ही.ए.रायकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १३.५.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.९.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.३०.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्या नोकरीच्या कालावधीतील पगाराचा तपशील आपण मागितला होता. त्याचे उत्तर अडीच महिन्यांनी दिले. अपिलीय प्राधिकारी तथा चेअरमन, के.आय.टी.अभियांत्रिकी महाविद्यालय, गोकुळ, ता.शिरगाव, जि.कोल्हापूर यांनी अपिलाच्या वेळी माहिती दिली, तीही चुकीची आहे, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.रामचंद्र बाळू शितोळे यांनी केली.

विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नसल्याचे अशा महाविद्यालयांच्या संघटनेचे मत आहे. तथापि, श्री.शितोळे यांना सर्व माहिती देण्यात आली आहे. सन १९८९ पासूनची माहिती त्यांनी मागितली होती. ती संकलित करून देणे विशिष्ट मुदतीत शक्य नव्हते. विशिष्ट नमुन्यातच माहिती मिळावी, अशी मागणी त्यांनी मूळ अर्जानुसार माहिती दिल्यानंतर केली. ती देण्याची तयारी असून चार दिवसात देण्यात येईल, असे लेखी व तोंडी प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, के.आय.टी.अभियांत्रिकी महाविद्यालय, गोकुळ शिरगाव, जि.कोल्हापूर श्री.डॉ.व्ही.ए.रायकर व अपिलीय प्राधिकारी तथा चेअरमन, के.आय.टी.अभियांत्रिकी महाविद्यालय, गोकुळ शिरगाव, जि.कोल्हापूर श्री.अ.पा.राणे यांनी केले. त्यानुसार माहिती देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, के.आय.टी.अभियांत्रिकी महाविद्यालय, गोकुळ शिरगाव, जि.कोल्हापूर डॉ.व्ही.ए.रायकर यांनी दि.१.१.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

(शिक्का: राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**पुणे**
**दि.३०.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्या समोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. शाम आबा अहिवळे — अपीलकर्ता
११५-अ, मंगळवार पेठ, फलटण, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय कृषि अधिकारी,
कृषि विभाग, फलटण, ता. फलटण, जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषि अधिकारी,
दहिवडी, ता. माण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०२ /२००९/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.१०.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय कृषि अधिकारी,<br>कृषि विभाग, फलटण, ता. फलटण, जि. सातारा श्री. आर.एच.सरतापे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषि अधिकारी,<br>दहिवडी, ता. माण, जि. सातारा श्री. राजेंद्र बाळासाहेब माने | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.३.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.५.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९.१०.२००९ व दि. २६.५.२००९ चे पत्र |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

**विवेचन**

कळविलेले शुल्क रू.२७२/- मनीऑर्डरने पाठवूनही जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, दहिवडी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही. माहिती निःशुक देण्याचा आदेश अपिलीय

प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, फलटण श्री. आर.एच.सरतापे यांनी देऊनही माहिती दिली नाही, असे श्री. अहिवळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात नमूद केले आहे.

श्री. अहिवळे यांनी दि. १.४.२००९ रोजी अर्ज केला होता. दि. १५.४.२००९ रोजी त्यांना शुल्क भरण्यास कळविले. दि. १२.५.२००९ रोजी चलनाद्वारे रक्कम त्यांनी पाठविल्यानंतर दि. १७.६.२००९ रोजी सर्व माहिती दिली. पाच मंडल कृषि अधिकाऱ्यांकडून संकलित करून माहिती द्यावी लागली. तसेच दि. १ मे ते ३१ मे या काळात संपूर्ण राज्यात कृषिदिंडी कार्यक्रम राबविण्यात आला, त्यात कार्यालयाची सर्व यंत्रणा सकाळी ७ ते सायंकाळी ७ पर्यंत कार्यरत होती. या सर्व कारणांमुळे माहिती देण्यास विलंब झाला, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी श्री. राजेंद्र बाळासाहेब माने यांनी केले. यापुढे असा विलंब होणार नाही याची दक्षता घेऊ. त्यासाठी शास्ती व अन्य कारवाई न करता एकवेळ संधी द्यावी, अशी विनंती जन माहिती अधिकारी श्री. माने यांनी केली. माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी श्री. माने यांना कारणे दाखवा नोटीस आपण दिली होती, त्यांनी नमूद केलेल्या विलंबाबाबतची कारणे रास्त आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी श्री. आर.एच.सरतापे यांनी केले.

जन माहिती अधिकारी श्री. माने यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. मात्र माहिती देण्याबाबत वाजवी मुदतीत कार्यवाही करण्याची समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. १६.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्या समोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. शाम आबा अहिवळे — अपीलकर्ता
११५-अ, मंगळवार पेठ, फलटण, जि.सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय कृषि अधिकारी,
कृषि विभाग, फलटण, ता. फलटण, जि. सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषि अधिकारी,
दहिवडी, ता. माण, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०२ /२००९/सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.१०.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय कृषि अधिकारी,<br>कृषि विभाग, फलटण, ता. फलटण, जि. सातारा श्री. आर.एच.सरतापे<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा तालुका कृषि अधिकारी,<br>दहिवडी, ता. माण, जि. सातारा श्री. राजेंद्र बाळासाहेब माने | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५.३.२००९ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.५.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ९.१०.२००९ व दि. २६.५.२००९ चे पत्र |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

कळविलेले शुल्क रू.२७२/- मनीऑर्डरने पाठवूनही जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, दहिवडी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही. माहिती नि:शुल्क देण्याचा आदेश अपिलीय

प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी, फलटण श्री. आर.एच.सरतापे यांनी देऊनही माहिती दिली नाही, असे श्री. अहिवळे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपील अर्जात नमूद केले आहे.

श्री. अहिवळे यांनी दि. १.४.२००९ रोजी अर्ज केला होता. दि. १५.४.२००९ रोजी त्यांना शुल्क भरण्यास कळविले. दि. १२.५.२००९ रोजी चलनाद्वारे रक्कम त्यांनी पाठविल्यानंतर दि. १७.६.२००९ रोजी सर्व माहिती दिली. पाच मंडल कृषि अधिकाऱ्यांकडून संकलित करून माहिती द्यावी लागली. तसेच दि. १ मे ते ३१ मे या काळात संपूर्ण राज्यात कृषिदिंडी कार्यक्रम राबविण्यात आला, त्यात कार्यालयाची सर्व यंत्रणा सकाळी ७ ते सायंकाळी ७ पर्यंत कार्यरत होती. या सर्व कारणांमुळे माहिती देण्यास विलंब झाला, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी श्री. राजेंद्र बाळासाहेब माने यांनी केले. यापुढे असा विलंब होणार नाही याची दक्षता घेऊ. त्यासाठी शास्ती व अन्य कारवाई न करता एकवेळ संधी द्यावी, अशी विनंती जन माहिती अधिकारी श्री. माने यांनी केली. माहिती देण्यास झालेल्या विलंबाबाबत जन माहिती अधिकारी श्री. माने यांना कारणे दाखवा नोटीस आपण दिली होती, त्यांनी नमूद केलेल्या विलंबाबाबतची कारणे रास्त आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी श्री. आर.एच.सरतापे यांनी केले.

जन माहिती अधिकारी श्री. माने यांची विनंती मान्य करण्यात येत आहे. मात्र माहिती देण्याबाबत वाजवी मुदतीत कार्यवाही करण्याची समज त्यांना देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**पुणे**
**दि. १६.११.२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी ईश्वर पाटील
दुसरी गल्ली, इंद्रप्रस्थ अपार्टमेंट,
फ्लॅट नं.९, जयसिंगपूर, ता.शिरोळा, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर — उत्तरवादी
**जन माहिती अधिकारी** तथा समाजकल्याण अधिकारी (गट अ),
जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजी ईश्वर पाटील
दुसरी गल्ली, इंद्रप्रस्थ अपार्टमेंट, फ्लॅट नं.९, जयसिंगपूर, ता.शिरोळा, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्रीमती रश्मी कुलकर्णी (प्रभारी)

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. --- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.१०.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२८.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी सौरभ मतिमंद मुलांची शाळा, जयसिंगपूर यांनी सादर केलेल्या पदमान्यता प्रस्तावाच्या प्रती व अन्य माहिती समाजकल्याण अधिकाऱ्यांकडील असूनही दिली जात नाही. संस्थेकडून माहिती घेण्यास कळविले जाते, ते योग्य नसून समाजकल्याण खात्यानेच माहिती दिली पाहिजे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.शिवाजी ईश्वर पाटील यांनी केले.

माहिती शाळांशी संबंधित असल्यामुळे अर्ज शाळेकडे वर्ग करण्यात आला. माहिती घेऊन जाण्याबाबत शाळेने श्री.पाटील यांना कळविले. माहिती देण्याबाबत शाळेला आदेश देण्यात आले असून शाळेने माहिती न दिल्यास पंचनामा करून ताब्यात घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर, जि.कोल्हापूर श्रीमती रश्मी कुलकर्णी यांनी केले.

संबंधित प्रस्तावाच्या प्रती समाजकल्याण अधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास आठ दिवसांत नि:शुल्क उपलब्ध करून द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिल निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.२४.११.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप जगन्नाथ पाटील
द्वारा-श्री.डी.टी.बचनकर
३/३३, सरदार चाळ, कुर्ला काजूपाडा पाईप लाईन,
कुर्ला (पश्चिम), मुंबई-७२ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण,
कोल्हापूर विभाग, राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय,
वारणानगर, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१०/ कोल्हापूर / |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप जगन्नाथ पाटील
द्वारा-श्री.डी.टी.बचनकर
३/३३, सरदार चाळ, कुर्ला काजूपाडा पाईप लाईन, कुर्ला (पश्चिम), मुंबई-७२

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण,
कोल्हापूर विभाग, राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर डॉ.बी.बी.कदम

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा प्राचार्य, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर डॉ.ए.एम.गुरव | | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.३.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.४.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.४.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.७.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२८.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपल्याला अपुरी माहिती देण्यात आली व मागितलेल्या कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर यांनी दिल्या नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.दिलीप जगन्नाथ पाटील यांनी केली.

प्रा.दिलीप जगन्नाथ पाटील हे अन्य प्राध्यापकांच्या रजेच्या काळात महाविद्यालयात कार्यरत होते. त्याबाबतची त्यांनी मागितलेली माहिती देण्यात आली आहे. साक्षांकित प्रतीची मागणी त्यांनी राज्य माहिती आयोगकडील अपिलात केली आहे. त्यानुसारही प्रती देण्यात आल्या, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य, यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर,

ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर डॉ.ए.एम.गुरव व अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर डॉ.बी.बी.कदम या दोघांनीही केले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:

## **आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे

---

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२४.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.गोविंद विनायक सोवनी
११८९, विष्णू गल्ली, तासगांव,
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप संचालक,
नगररचना, पुणे विभाग, पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक,
नगररचना आणि मुल्यनिर्धारण विभाग,
३५०, मार्केट यार्ड, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५११ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.०४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री.गोविंद विनायक सोवनी
११८९, विष्णू गल्ली, तासगांव,
जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप संचालक,
नगररचना, पुणे विभाग, पुणे — श्रीमती साधना प्र.नाईक

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक,
नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग,
३५०, मार्केट यार्ड, सांगली — श्री.एस.जी.पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२१.०८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१७.०९.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.०५.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०१.११.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपल्या जागेच्या आरक्षणाबाबतची आपण मागितलेली माहिती चुकीची दिली तसेच आपल्या जागेत बांधकामाची परवनागी नाकारली, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.गोविंद विनायक सोवनी यांनी केली.

तासगाव शहराच्या विकास योजनेनुसार संबंधित जागेवर आरक्षण असल्याने बांधकामाची परवानगी श्री.सोवनी यांना मिळू शकत नाही. आरक्षण रद्द करणे आदी बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या व आपल्या कार्यालयाच्या कक्षेत येत नाहीत. श्री.सोवनी यांनी जमिनीच्या मालकी हक्काच्या उताऱ्यासह नगरपरिषदेकडे बांधकामाची रीतसर परवानगी मागणी करीत नाहीत तोपर्यंत त्यांच्या मालकीच्या जागांच्या हद्दी त्यावरील मंजूर विकास योजनेतील विकास प्रस्ताव, अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र इत्यादीं तांत्रिक बाबींची पडताळणी करता येत नाही, असे त्यांना स्पष्ट करण्यात आले आहे, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक,नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग,३५०, मार्केट यार्ड, सांगली श्री.एस.जी.पाटील यांनी लेखी व तोंडी नमूद केले.

नियमावलीची व भाग नकाशाची प्रत श्री.सोवनी यांना देण्यात आली. संचिकेतील अन्य कोणतीही कागदपत्रे देण्यास कार्यालयाची तयारी आहे. आरक्षण वगळण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला असून तो प्रलंबित आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा उप संचालक,नगररचना, पुणे विभाग, पुणे श्रीमती साधना प्र.नाईक यांनी नमूद केले.

आरक्षण वगळण्याची कार्यवाही ही प्रशासकीय बाब असून माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत येत नाही. तथापि संबंधित प्रस्तावाबाबत शासनाकडून झालेल्या कार्यवाहीबाबतची माहिती अपीलकर्त्यास १५ दिवसांत द्यावी, असे मोखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार आपण दि.०४.०५.२००९ च्या पत्रान्वये नगर विकास विभागाकडे विचारणा केली होती. तासगाव नगरपरिषदेने फेरबदलाचा प्रस्ताव दि.१३.०९.२००१ रोजी शासनाला

सादर केला. त्यावर संचालक, नगररचना यांचे अभिप्राय दि.१९.०६.२००३ व सुधारित अभिप्राय दि.०९.०६.२००५ च्या पत्रान्वये शासनाला प्राप्त झाले. तद्नंतर सदर प्रकरणी बांधकाम परवानगीबाबतचा खुलासा शासनाने तासगाव नगरपरिषदेकडून दि.२८.०२.२००६ च्या पत्रान्वये मार्गविला असून पुन्हा दि.०९.१०.२००७ रोजी नगरपरिषदेस स्मरणपत्र पाठविले आहे. तासगाव नगरपरिषदेन अद्याप असा खुलासा सादर केला नसल्यामुळे प्रस्तावाबाबत पुढील कार्यवाही झालेली नाही, असे अवर सचिव, नगरविकास विभागाने कळविल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना आणि मूल्यनिर्धारण विभाग, ३५०, मार्केट यार्ड, सांगली श्री.एस.जी.पाटील यांनी दि.०२.०६.२००९ च्या पत्रान्वये आयोगास कळविले. संबंधित खुलाशाबाबत नगरपरिषदेने केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलकर्त्यास मिळणे आवश्यक आहे, ती देण्याची जबाबदारी नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांची आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. नगर विकास विभागाने मागविलेल्या खुलाशाबाबत नगरपरिषद, तासगाव यांनी केलेल्या कार्यवाहीची माहिती मुख्याधिकारी, नगरपरिषद, तासगाव यांनी दि.२०.१२.२००९ पर्यंत अपीलकर्त्यास द्यावी व आयोगास अनुपालन अहवाल सादर करावा.

**पुणे**
**दिनांक : २७/११/२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रभाकर चिंतामण कुलकर्णी
अक्षय, २२, आनंद सह.गृहनिर्माण संस्था,
शाहूनगर, गोडोली, सातारा

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव,
सार्वजनिक आरोग्य विभाग/सेवा-१, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अवर सचिव,
सार्वजनिक आरोग्य विभाग/सेवा-१, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५१६ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रभाकर चिंतामण कुलकर्णी
अक्षय, २२, आनंद सह.गृहनिर्माण संस्था, शाहूनगर, गोडोली, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग/सेवा-१,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई श्रीमती चारूशीला तांबेकर

**जन माहिती अधिकारी** तथा अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग/सेवा-१,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई श्री.गो.ग.आल्हाट

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ४.८.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| | |
|---|---|
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. |

## विवेचन

आरोग्य सेवक व आरोग्य सहाय्यक यांना द्यावयाच्या वेतनश्रेणीबाबत सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप हत्तीरोग व जडजन्य रोग) यांनी दि.५.५.२००८ रोजी पाठविलेल्या प्रस्तावाला अद्याप मान्यता मिळालेली नाही. चार वर्षांपासून याबाबत पत्रव्यवहार चालू असून प्रकरण सार्वजनिक आरोग्य विभागात प्रलंबित आहे. कर्मचाऱ्यांकडून अतिप्रदान वसुलीचे आदेश दिले जात आहेत. त्यामुळे ११-१-अ प्रमाणे वेतननिश्चितीस मान्यतेचे आदेश द्यावेत, अशी मागणी अपीलकर्ता श्री.प्रभाकर चिंतामण कुलकर्णी यांनी केली.

श्री.कुलकर्णी यांची मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. या अनुषंगाने त्यांनी मागितलेली माहिती तयार असल्याचे त्याना कळविले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग /सेवा-१, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई श्री.गो.ग.आल्हाट यांनी केले.

श्री.कुलकर्णी यांची मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची असली तरी त्या संदर्भातील सद्यस्थितीची माहिती त्यांना दिली जाणे आवश्यक आहे. एक आठवड्यात त्यांना ती दिली जावी असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

(२) सुनावणीच्या वेळी आयोगाने दिलेल्या मौखिक आदेशाच्या अनुपालनाचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग /सेवा-१, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई श्री.गो.ग.आल्हाट यांनी **३१**.१२.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

पुणे
दि.३०.१२.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**

**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

सौ.लता शंकर खरात
मु.पो.बाज, ता.जत,
जि.सांगली

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती जत, जि.सांगली

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
बाज, ग्रामपंचायत जत, जि. सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२० / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२९.०४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - सौ.लता शंकर खरात
मु.पो.बाज, ता.जत,
जि.सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा गट विकास अधिकारी,
पंचायत समिती जत, जि.सांगली श्रीमती अरुणा ईटाई

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक,
बाज, ग्रामपंचायत जत, जि. सांगली श्री.बी.टी.रुपनुर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१९.०६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२७.०९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१४.०८.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२९.०९.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहिती-अर्जाच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

ग्रामपंचायतीच्या बैठकींबाबतची माहिती खोटी दिली. बैठका झाल्या नसताना बैठका झाल्याचे दाखविण्यात आले. पूर्वीच्या बैठकांच्या नोटिसा आपल्याला मिळत असत. परंतु गेल्या आठ महिन्यांतील बैठकीच्या नोटिसा देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, बाज, ग्रामपंचायत जत, जि. सांगली यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्त्या सौ. लता शंकर खरात यांनी केली.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, बाज, ग्रामपंचायत जत, जि. सांगली श्री.बी.टी.रुपनुर यांनी माहिती विहित मुदतीत दिली नव्हती. त्यामुळे त्यांना 'कारणे दाखवा' नोटीस देऊन माहिती प्राप्त करुन घेतली. त्यानंतर तीन वेळा सौ. लता शंकर खरात यांना माहिती देण्यासाठी खास दूतामार्फत पाठविली, परंतु त्यांनी ती घेतली नाही. त्यामुळे नोंदणीकृत टपालाने पाठविली. ग्रामपंचायतीच्या अनुषंगाने सौ.खरात यांच्यासह अन्य तीन व्यक्तींनी अर्ज व अपिले केली होती. माहिती मिळाल्याचे त्यांनी कळविल्यामुळे आयोगाने त्यांची अपिले निकाली काढली आहेत. सौ.खरात यांनी मांडलेल्या मुद्दयांप्रमाणे आठ दिवस सर्व अभिलेखांची तपासणी केली. ग्रामपंचायतीच्या बैठकांना सातत्याने गैर हजर असल्यामुळे सभासदत्व रद्द होणार असल्यामुळे अशा स्वरुपाचे अर्ज अपीलकर्ते करीत आहेत, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, बाज, ग्रामपंचायत जत, जि. सांगली श्री.बी.टी.रुपनुर व अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती जत, जि.सांगली श्रीमती अरुणा ईटाई यांनी केले.

संबंधित रजिस्टरच्या छायांकित प्रतींसह कार्यवाहीचा अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती जत, जि.सांगली यांनी एक आठवड्यात आयोगला सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती जत, जि.सांगली श्रीमती अरुणा ईटाई यांनी

दि.०४.०५.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला अहवाल सादर केला. तत्कालीन ग्रामसेवक श्री.बी.टी.रुपनुर यांचे दि.०९.११.२००८ रोजी अपघातील निधन झाल्याचे या अहवालात नमूद केले आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दिनांक : २०/११/२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सुरेश पांडुरंग भंडारी
मु.पो.दहिवली बु.(निमेवाडी), ता.चिपळूण, जि.रत्नागिरी — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक,
शिक्षण विभाग, विभागीय कार्यालय, हत्ती महाल, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शासकीय माहिती अधिकारी,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२१+५२२ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा शिक्षण उपसंचालक, शिक्षण उपसंचालक,
शिक्षण विभाग, विभागीय कार्यालय, हत्ती महाल, कोल्हापूर प्रतिनिधी श्री.पी.जी.साठे

**जन माहिती अधिकारी** तथा शासकीय माहिती अधिकारी,
शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर श्री.पी.जी.साठे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.८.२००६(अ.क्र.५२१)<br>दि.२८.८.२००६ (अ.क्र.५२२) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.९.२००६(अ.क्र.५२१ /५२२) |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.९.२००६(अ.क्र.५२१/५२२) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.१०.२००६ (अ.क्र.५२१)<br>दि.२५.९.२००६ (अ.क्र.५२२) |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.३०.१२.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२८.४.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.सुरेश पांडुरंग भंडारी यांनी मागणी केलेली सर्व माहिती त्यांना देण्यात आली. शाळा न्यायाधिकरण, कोल्हापूर यांच्या निर्णयानुसार दि.२१.६.१९९० पासून आपल्याला हजर करून घ्यावे, तसेच सेवाखंड न धरता सलग सेवेनुसार वेतननिश्चिती व्हावी, अशी त्यांची मागणी असून, हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अंतर्गत येत नाही, तो प्रशासकीय कार्यवाहीचा आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा शासकीय माहिती अधिकारी, शिक्षण उपसंचालक कार्यालय, कोल्हापूर श्री.पी.जी.साठे यांनी केले. ते रास्त आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि.३०.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.संजय श्रीपाद कुलकर्णी
वॉर्ड नं.२, घर नं.५९३, नदिवेस, इचलकरंजी,
ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक, उपनिबंधक, सहकारी संस्था,
हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२३ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.७.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संजय श्रीपाद कुलकर्णी
वॉर्ड नं.२, घर नं.५९३,नदिवेस, इचलकरंजी, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्रीमती एन.व्ही.गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक, उपनिबंधक, सहकारी संस्था,
हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.बी.आर.डोंगळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४.९.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.१०.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. -- |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.७.२.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

दि इचलकरंजी सेंट्रल को-ऑप. होलसेल अँड रिटेल स्टोअर्स या संस्थेबाबतची आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर यांनी दिली नाही. संस्थेकडून माहिती घेण्यास आपल्याला सांगण्यात आले. परंतु संस्थेचे सर्व अभिलेख उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात असल्यामुळे त्यांच्याकडून माहिती मिळणे आवश्यक होते, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.संजय श्रीपाद कुलकर्णी यांनी केले.

माहिती संस्था स्तरावरील असल्यामुळे संस्थेकडून घेण्याबाबत श्री.कुलकर्णी यांना कळविले व माहिती देण्याबाबत संस्थेला कळविले. परंतु संस्थेकडून माहिती उपलब्ध झाली नाही, की अपीलकर्त्याने ती संस्थेकडून उपलब्ध करून घेतली नाही, हे उपनिबंधक कार्यालयाला कळविले गेले नाही. प्रथम अपील न करता श्री.कुलकर्णी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. आयोगाकडील अपिलाबाबतची माहिती कळल्यानंतर संस्थेमध्ये जाऊन माहिती स्वत: घेऊन आलो. परंतु ती सत्यप्रत नसल्याच्या कारणावरून अपीलकर्त्याने नाकारली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, उपनिबंधक सहकारी संस्था, हांतकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्री.बी.आर.डोंगळे यांनी केले. संबंधित संस्था गेल्या चार वर्षांपासून

बंद असून माहिती प्राप्त करून घेतली आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, हातकणंगले, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर श्रीमती एन.व्ही.गायकवाड यांनी नमूद केले.

श्री.कुलकर्णी यांनी माहिती न स्वीकारल्यामुळे ती रजिस्टर्ड टपालाने पाठविण्यात आली. ती अपुरी व चुकीची असल्याची तक्रार श्री.कुलकर्णी यांनी दि.२५.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. तथापि, माहिती संस्था स्तरावरील असून ती मिळवून देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केला आहे. देऊ केलेली माहिती त्याच वेळी अपीलकर्त्याने स्वीकारणे आवश्यक होते. तसेच प्रथम अपीलही करावयास हवे होते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.३०.११.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.भिमराव दत्तात्रय कोकणे
१६/२३५, घोडके नगर, इचलकरंजी, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद,
इचलकरंजी, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मिळकत व्यवस्थापक,
इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२६ / कोल्हापूर ~~/ २००~~ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.भिमराव दत्तात्रय कोकणे
१६/२३५, घोडके नगर, इचलकरंजी, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद,
इचलकरंजी, जि.कोल्हापूर श्री.त्रिं.कृ.ढेंगळे-पाटील

**जन माहिती अधिकारी** तथा मिळकत व्यवस्थापक,
इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, जि.कोल्हापूर श्री.श्रीकांत पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.६.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.७.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.७.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २९.८.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.७.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.१९.३.२००९ रोजी घेण्यात आली.

अपंगांसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दुकान गाळे आरक्षित असण्याबाबतच्या शासन निर्णयाची प्रत आढळून येत नसल्याचे उत्तर जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक, इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, जि.कोल्हापूर यांनी दिले. शासन धोरणानुसार अपंगांसाठी गाळे राखीव ठेऊन नियमाप्रमाणे भाड्याने दिले आहेत, असे जन माहिती अधिकाऱ्यांच्या पत्रात म्हटले असल्यामुळे शासन निर्णयाची प्रत मिळाली पाहिजे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.भिमराव दत्तात्रय कोकणे यांनी केले.

श्री.कोकणे म्हणतात त्याप्रमाणे शासन निर्णय झालेला नाही. त्यांच्या पत्रातील उल्लेखामुळे अन्य नगरपालिकांकडे व वरिष्ठ कार्यालयाकडेही त्याबाबत विचारणा केली, परंतु असे निर्णय उपलब्ध झाले नाहीत. शासकीय जमिनीबाबत असलेल्या निर्णयाची माहिती श्री.कोकणे यांना दिली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.श्रीकांत पाटील यांनी केले. श्री.कोकणे यांची मुख्य मागणी सवलतीच्या भाड्याने नगरपरिषदेकडील गाळा मिळावा अशी आहे. नगरपरिषदेकडे दोन टक्के गाळे आरक्षित आहेत, त्यातून श्री.कोकणे यांना गाळा देता येईल, असे प्रतिपादन अपिलीय

प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, इचलकरंजी नगरपरिषद, इचलकरंजी, जि.कोल्हापूर श्री.त्रिं.कृ.ढेंगळे-पाटील यांनी केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निवेदनानुसार पत्र श्री.कोकणे यांना द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१०.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दशरथ लक्ष्मण सुर्वे
मु.शिंदेवाडी, पो.खुंटे, ता.फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
धोम कलवे विभाग क्र.२, सातारा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२७ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दशरथ लक्ष्मण सुर्वे
मु.शिंदेवाडी, पो.खुंटे, ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा, जि.सातारा श्री.किरण भालचंद्र कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
धोम कलवे विभाग क्र.२, सातारा, जि.सातारा श्री.नितीन नामदेव सुपेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ----- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.१०.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.१८.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण मागितलेली माहिती दीड महिना विलंबाने दिली. त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.दशरथ लक्ष्मण सुर्वे यांनी केली.

श्री.सुर्वे यांनी जन माहिती अधिकारी म्हणून आपल्याकडे अर्ज केला नव्हता. उपविभागीय अभियंता, कृष्णानगर वसाहत उपविभाग, सातारा यांच्याकडे अर्ज केला होता. त्यांनी माहिती न दिल्याने श्री.सुर्वे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा यांच्याकडे अपील केल्यानंतर आपल्याला अर्जाबाबतची माहिती मिळाली. दोन दिवसांत माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा यांनी दिले. तसे उपविभागीय अभियंता, कृष्णानगर वसाहत उपविभाग, सातारा श्री.प्र.ना.कुलकर्णी यांना कळविल्यानंतरही त्यांनी माहिती उपलब्ध करून दिली नाही, त्यामुळे विहित मुदतीत माहिती देता आली नाही. माहिती त्वरित न दिल्यास होणाऱ्या कारवाईस आपणच जबाबदार राहाल व नियमानुसार आपणावर शास्तीची कारवाई होईल, असे श्री.कुलकर्णी यांना दि.२४.१०.२००८ च्या पत्रान्वये कळविले होते. त्यानंतरही त्यांच्याकडून माहिती मिळाली नाही, म्हणून विभागीय कार्यालयाने पाठपुरावा करून दि.१.१२.२००८ रोजी श्री.सुर्वे यांना माहिती पाठविली, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, धोम कालवे विभाग क्र.२, सातारा श्री.नितीन नामदेव सुपेकर यांनी नमूद केले. त्याच्या प्रतिपादनास अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा श्री.किरण भालचंद्र कुलकर्णी यांनी दुजोरा दिला.

श्री.सुर्वे यांनी श्री.प्र.ना.कुलकर्णी यांच्या संदर्भातीलच माहिती मागितली होती. त्यांनी स्वतः माहिती दिली नाही व अर्ज जन माहिती अधिकाऱ्यांकडे वर्ग केला नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी सूचनापत्र व कारवाईची जाणीव देणारे स्मरणपत्र पाठवूनही

श्री.कुलकर्णी यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास त्यांच्या दि.३.७.२००८ च्या अर्जानुसार दि.१.१२.२००८ रोजी माहिती पाठविली गेली. श्री.प्र.ना.कुलकर्णी यांनी याबाबत खुलासा करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री.कुलकर्णी यांनी दि.२१.३.२००९ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. मात्र विलंबाचे त्यांनी दिलेले स्पष्टीकरण ढोबळ स्वरूपाचे आहे. माहिती त्वरित उपलब्ध करून दिली होती, असे त्यांनी म्हटले असले तरी, त्याबाबतचा कोणताही साधार तपशील नमूद केलेला नाही. आपण हेतुपुरस्सर उशीर केला नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. मात्र हा खुलासा मान्य करता येणार नाही, ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) अर्ज जन माहिती अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यास असलेली पाच दिवसांची मुदत व माहिती देण्यास असलेली तीस दिवसांची मुदत असे ३५ दिवस वजा जाता अपीलकर्त्यास माहिती देण्यास ११८ दिवस विलंब झाला आहे व त्याला श्री.प्र.ना.कुलकर्णी, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, कृष्णानगर वसाहत, उपविभाग, सातारा हे जबाबदार आहेत. त्यामुळे त्यांना (प्रतिदिन रु.२५०/- प्रमाणे २९५००/-=२५०००) रू.२५००० इतकी शास्ती करण्यात येत आहे. ही शास्ती जानेवारी २०१० मध्ये देय असलेल्या डिसेंबर २००९ च्या वेतनापासून दोन समान हप्त्यात वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा श्री.किरण भालचंद्र कुलकर्णी यांनी करून व याची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन त्यांच्या छायांकित प्रतीसह अहवाल आयोगाला सादर करावा.

पुणे
दि.३०.११.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री. प्रताप शिवाजीराव जाधव
हॉटेल संतोष भुवन, हरभट रोड,
सांगली ४१६ ४१६

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा मुख्य लेखापाल,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका,
सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२७ / सांगली |

२ उपस्थित

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
सांगली , मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, सांगली यांचे प्रतिनिधी
श्री. वाय.बी. माळी

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २७.११.२००७ |
| ४ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.१२.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.१.२००८ |

७ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :- मूळ माहिती-मागणी अर्जाची (जोडपत्र अ) छाया प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

अपीलकर्ता श्री. प्रताप शिवाजीराव जाधव यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलाचा समावेश दि. २२/१०/२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा' मध्ये होता. त्यावेळी उभय बाजूंत एकमत न झाल्याने दि. २३.६.२००९ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती.

आवश्यक माहिती प्राप्त झाल्याने अपील निकाली काढण्यास कोणतीही हरकत नाही, असे दि. २३.६.२००९ रोजीच्या निवेदनाव्दारे अपीलकर्ता श्री.जाधव यांनी आयोगास कळविले आहे. आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २६-११-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दशरथ लक्ष्मण सुर्वे
मु.शिंदेवाडी, पो.खुंटे, ता.फलटण, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
धोम कलवे विभाग क्र.२, सातारा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५२७ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दशरथ लक्ष्मण सुर्वे
मु.शिंदेवाडी, पो.खुंटे, ता.फलटण, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा, जि.सातारा श्री.किरण भालचंद्र कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
धोम कलवे विभाग क्र.२, सातारा, जि.सातारा श्री.नितीन नामदेव सुपेकर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ----- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.९.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १३.१०.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.१८.३.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण मागितलेली माहिती दीड महिना विलंबाने दिली. त्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.दशरथ लक्ष्मण सुर्वे यांनी केली.

श्री.सुर्वे यांनी जन माहिती अधिकारी म्हणून आपल्याकडे अर्ज केला नव्हता. उपविभागीय अभियंता, कृष्णानगर वसाहत उपविभाग, सातारा यांच्याकडे अर्ज केला होता. त्यांनी माहिती न दिल्याने श्री.सुर्वे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा यांच्याकडे अपील केल्यानंतर आपल्याला अर्जाबाबतची माहिती मिळाली. दोन दिवसांत माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा यांनी दिले. तसे उपविभागीय अभियंता, कृष्णानगर वसाहत उपविभाग, सातारा श्री.प्र.ना.कुलकर्णी यांना कळविल्यानंतरही त्यांनी माहिती उपलब्ध करून दिली नाही, त्यामुळे विहित मुदतीत माहिती देता आली नाही. माहिती त्वरित न दिल्यास होणाऱ्या कारवाईस आपणच जबाबदार राहाल व नियमानुसार आपणावर शास्तीची कारवाई होईल, असे श्री.कुलकर्णी यांना दि.२४.१०.२००८ च्या पत्रान्वये कळविले होते. त्यानंतरही त्यांच्याकडून माहिती मिळाली नाही, म्हणून विभागीय कार्यालयाने पाठपुरावा करून दि.१.१२.२००८ रोजी श्री.सुर्वे यांना माहिती पाठविली, असे जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, धोम कालवे विभाग क्र.२, सातारा श्री.नितीन नामदेव सुपेकर यांनी नमूद केले. त्याच्या प्रतिपादनास अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा श्री.किरण भालचंद्र कुलकर्णी यांनी दुजोरा दिला.

श्री.सुर्वे यांनी श्री.प्र.ना.कुलकर्णी यांच्या संदर्भातीलच माहिती मागितली होती. त्यांनी स्वतः माहिती दिली नाही व अर्ज जन माहिती अधिकाऱ्यांकडे वर्ग केला नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयानंतर जन माहिती अधिकाऱ्यांनी सूचनापत्र व कारवाईची जाणीव देणारे स्मरणपत्र पाठवूनही

श्री.कुलकर्णी यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास त्यांच्या दि.३.७.२००८ च्या अर्जानुसार दि.१.१२.२००८ रोजी माहिती पाठविली गेली. श्री.प्र.ना.कुलकर्णी यांनी याबाबत खुलासा करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार श्री.कुलकर्णी यांनी दि.२१.३.२००९ च्या पत्रान्वये खुलासा सादर केला. मात्र विलंबाचे त्यांनी दिलेले स्पष्टीकरण ढोबळ स्वरूपाचे आहे. माहिती त्वरित उपलब्ध करून दिली होती, असे त्यांनी म्हटले असले तरी, त्याबाबतचा कोणताही साधार तपशील नमूद केलेला नाही. आपण हेतुपुरस्सर उशीर केला नसल्याचे त्यांनी म्हटले आहे. मात्र हा खुलासा मान्य करता येणार नाही, ते शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य करण्यात येत आहे.

(२) अर्ज जन माहिती अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यास असलेली पाच दिवसांची मुदत व माहिती देण्यास असलेली तीस दिवसांची मुदत असे ३५ दिवस वजा जाता अपीलकर्त्यास माहिती देण्यास ११८ दिवस विलंब झाला आहे व त्याला श्री.प्र.ना.कुलकर्णी, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, कृष्णानगर वसाहत, उपविभाग, सातारा हे जबाबदार आहेत. त्यामुळे त्यांना (प्रतिदिन रु.२५०/- प्रमाणे २९५००/-=२५०००) रू.२५००० इतकी शास्ती करण्यात येत आहे. ही शास्ती जानेवारी २०१० मध्ये देय असलेल्या डिसेंबर २००९ च्या वेतनापासून दोन समान हप्त्यात वसूल करून '००७, इतर प्रशासकीय सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सातारा पाटबंधारे प्रकल्प मंडळ, सातारा श्री.किरण भालचंद्र कुलकर्णी यांनी करून व याची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन त्यांच्या छायांकित प्रतीसह अहवाल आयोगाला सादर करावा.

**पुणे**
**दि.३०.११.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**